
# भेटी लागी जीवा

गुरुदयाल सिंह

अनुवाद :

डॉ. पद्मा पाटील





## गुरुदयाल सिंह

जन्म : १० जानेवारी १९३३ पंजाबी भाषा साहित्यातील प्रख्यात साहित्यकार. कादंबरी, कथा, नाटक, एकांकिका, बाल साहित्य व अनुवाद अशा विविध साहित्य प्रकारांमध्ये लेखन. ९ कादंबऱ्या, ११ कथासंग्रह, ३ नाटके, ३ गद्य लेखन, ८ बाल साहित्य संग्रह प्रकाशित. मढी का दीवा (१९६४), अध चांदनी रात (१९७२), अंधे घोडे दा दान (१९६७), परसा (१९९९) प्रसिद्ध कादंबऱ्या. 'मढी का दीवा' या पहिल्या कादंबरीवर राष्ट्रीय चित्रपट विकास मंडळाद्वारे १९८९ मध्ये चित्रपट निर्मिती. १९९२ साली जर्मनीतील चित्रपट महोत्सवामध्ये चित्रपट प्रदर्शित होण्याचा बहुमान. आंतरराष्ट्रीय ख्यातिप्राप्त गुरुदयाल सिंह यांनी इंग्रजीतून केलेल्या अनेक अनुवादांना वाचकांकडून पसंती.

- आठ साहित्यिक रचनांसाठी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय सन्मान / पुरस्कार प्राप्त
- नानक सिंह कादंबरी पुरस्कार
- पाश पुरस्कार
- उत्तर प्रदेश साहित्य सम्मेलन सन्मान
- पंजाबी साहित्य अकादमी पुरस्कार
- साहित्य अकादमी पुरस्कार
- भारतीय ज्ञानपीठ पुरस्कार
- पद्मश्री इ. अनेक पुरस्कार

कष्टकरी, दरिद्री समाज जीवनाचे वस्तुनिष्ठ चित्रण हे त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य आहे. 'मढी का दीवा' या कादंबरीच्या रशियन भाषेतील अनुवादाची पहिली आवृत्ती प्रकाशनानंतर काही दिवसातच अप्राप्य.

सम्प्रति : जैतो, ज्ञानपीठ मार्ग, फरीदकोट, पंजाब



## डॉ. पद्मा पाटील

- प्रोफेसर व हिंदी विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर. भ्रमणध्वनी : ९८२३०७७७६९
- कथा, कविता, समीक्षा, वैचारिक लेखन (हिंदी व मराठी)
- विविध साहित्यिक, समीक्षात्मक, अनुवादित व संपादित हिंदी व मराठी ३६ पुस्तके प्रकाशित.
- सृजनात्मक व समीक्षात्मक साहित्याचा पोलिश, उडिया, कन्नड व मराठी भाषांमध्ये अनुवाद.

साहित्यिक सन्मान :

- ताज मुगलिनी सन्मान, अखिल भारतीय कवयित्री परिषद, खुर्जा २००३.
- आंतरराष्ट्रीय त्रिनिदाद हिंदी शिखर सन्मान, त्रिनिदाद ॲण्ड टोबॅगो. वेस्ट इंडिज.- २०११, रु. २५,०००/-
- हिंदीतर भाषी हिंदी लेखक पुरस्कार, मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.-२०१२ (पुस्तकः मुक्तिबोध की कविता - रु. १,००,०००/-)

- सबरगमुवा विद्यापीठ, श्रीलंका., भारतीय विद्या संस्थान, त्रिनिदाद ॲण्ड टोबॅगो. वेस्ट इंडिज अशा विदेशी विद्यापीठे व संस्थांमध्ये संसाधन विशेषज्ञ म्हणून कार्यरत.

# भेटी लागी जीवा

गुरदयाल सिंह

अनुवाद
डॉ.पद्मा पाटील

## अनुवादकाचे मनोगत

प्रख्यात पंजाबी लेखक गुरदयाल सिंह यांच्या 'मढो का दीवा' या हिंदी कादंबरीचा मराठी अनुवाद 'भेटी लागी जीवा' या शीर्षकाचे वाचकांच्या हाती देताना मला आनंद होत आहे. गुरदयाल सिंह मूळ पंजाबी लेखक.त्यांच्या नावे अनेक साहित्यिक रचना आहेत. तसेच अनेक पुरस्कार व सन्मानही.साहित्य क्षेत्रातील सर्वोच्च भारतीय ज्ञानपीठ सन्मान व भारत सरकारचा पद्मश्री सन्मानामुळे आपणास त्यांच्या असाधारण व्यक्तिमत्वाची जाणीव होते. त्यानी पंजाबी व हिंदी दोन्ही भाषांमध्ये केलेले सृजनात्मक लेखन त्यांची साहित्यकार रूपातील क्षमता स्पष्ट करते.या कादंबरीच्या सहवासात मी व्यतीत केलेला काही काळ उत्कट अनुभवाचा होता. शोकपर्यवसायी साहित्य मनाला एक विलक्षण आनंद देऊन जाते, त्या आनंदाचा मी अनुभव घेतला.

जगत्‌विख्यात रशियन लेखक टॉलस्टॉय यांच्या 'युद्‌ध आणि शांतता' या कादंबरीशी तुलना केलेली 'मढी का दीवा' ही कादंबरी म्हणजे शोषितांच्या जीवनाचे वास्तव उत्कट, भावपूर्ण ,सरस नि हुबेहुब चित्रण आहे. कृत्रिमतेला तेथे प्रवेशच नाही. भारतीय ग्रामीण समाजरचनेमधील एका वेदनापीडित, अभावग्रस्त, दरिद्री शेतकऱ्याची ही शोकपर्यवसायी कथा. अन्तश्चक्षू जागृत ठेवणाऱ्याला असे कथानायक 'जगसीर'सर्वत्र दिसतील. गरीबी–श्रीमंती, उच्च–नीच जातिव्यवस्था, अपेक्षाभंग,विश्वासघात असा सर्वार्थाने होरपळून गेलेला जगसीर हा कादंबरीचा नायक. कादंबरी संपली तरी त्याचा दु:खद अंत मनावर, हृदयावर आघात करतच राहतो. लेखकाची समाजव्यवस्थेकडे पाहाण्याची सूक्ष्म व चिकित्सक दृष्टी कथानकाच्या प्रत्येक शब्दातून सुबुद्ध वाचकाला जाणवत राहते. दारिद्र्याचा अव्हेर करणारी श्रीमंती, सामाजिक स्थान निर्देशित करणारी जातिव्यवस्था, कौटुंबिक हेवेदावे, असफल विवाह, जवळच्या व्यक्तींकडून विश्वासघात, चालीरीती, पारंपारिक अंधश्रद्‌धा या सर्व सकटाच्या जोडीला ग्रामीण अर्थव्यवस्थेतील अर्थनीती, दलालांचा हस्तक्षेप हेही फार प्रभावी अडसर असतात. खरे तर त्यामुळेच शेतकरी आर्थिक गर्तेत अधिकाधिक रुतत

जातो. वित्तीय संस्थेचे हे भयावह परिणाम वाचक 'जगसीर'च्या रूपानं स्वत: अनुभवतो. जगसीरच्या वैराण, भकास, निरुपाय आयुष्यात आनंद देणारी नायिका 'भानी' लेखकाने अशा कौशल्याने शब्दांकित केली आहे की त्यामुळेच वाचकाचे हृदय हेलावून जाते. उदात्त प्रेमभावनेचा हा उत्कट आविष्कार कादंबरी संपताना सहृदय वाचकांना भावनिकदृष्ट्या सहन होत नाही. स्त्रीपात्रांचे चित्रण तर मनावर जबरदस्त प्रभाव करते. मानवीय गुणावगुणांचा बळी ठरलेल्या जगसीर नि बन्ते यांचा संवाद मनाला पटवून देतो की बंधुत्वाच्या भावनेला स्वार्थांधता अडवते. तेथे व्यवहार महत्त्वाचा, भावनेला थारा नाही.कादंबरी वाचत असताना वाटले की काचेच्या लोलकातून प्रकाशकिरणांचे पृथ:करण होऊन विविध रंग दिसतात तसे जगसीरचं दरिद्री, जातिभेद, विषम अर्थव्यवस्था नि असफल प्रेम यांच्याशी संघर्ष करत व्यतीत झालेलं आयुष्य भाषेच्या मर्यादेत राहणे अयोग्य आहे. सामान्य माणसाचा हा संघर्ष सर्वांना समजला पाहिजे म्हणून हे मराठी भाषांतर. अनिर्वचनीय आनंदानुभूतीसह हे भाषांतर वाचकांच्या हाती देत आहे.

साहित्यकार गुरुदयाल सिंह यांच्याशी निर्माण झालेल्या ऋणानुबंधाने या कादंबरीच्या भाषांतर कार्याला एक वेगळीच गती प्राप्त झाली. त्यांच्याशी वेळोवेळी पंजाबी वातावरणासंबंधी झालेली चर्चा भाषांतराला विशिष्ट सांस्कृतिक, सामाजिक बाज देऊन गेली. मी या साहित्यकाराला दीर्घ सृजनात्मक आयुष्याबद्दल शुभेच्छा देते. 'मढी का दीवा' या कादंबरीचे रशियन भाषेतही भाषांतर झालेले आहे. गुरुदयाल सिंह व त्यांच्या कुटंबीयांबद्दल मन:पूर्वक आभार.प्रकाशक डॉ.शिवाजीराव देशमुख, अमरावती, हेमंत मुद्रणालय, कोल्हापुर यांची आभारी आहे.माझ्या कुटंबीयांनी केलेले सहकार्य आभाराच्या पलीकडील आहे. आई डॉ. शैलजा पाटील बरोबर भाषांतरबद्दल झालेली चर्चा फारच उपयोगी राहिली. प्रत्यक्ष—अप्रत्यक्षपणे मदत झालेल्या सर्वांची मी कृतज्ञ आहे.

डॉ.पद्मा पाटील

# अनुवादक की भूमिका

विख्यात पंजाबी साहित्यकार गुरुदयाल सिंह के 'मढी का दीवा' हिंदी उपन्यास का मराठी अनुवाद 'भेटी लागी जीवा'शीर्षक से पाठकों के सम्मुख रखते हुए बहुत आनंद हो रहा है। गुरुदयाल सिंह जी के नाम पर अनेक सृजनात्मक रचनाएँ हैं। वे अनेक पुरस्कार तथा सम्मानों से विभूषित हैं। साहित्य क्षेत्र का सर्वोच्च भारतीय ज्ञानपीठ सम्मान,भारत सरकार का पद्मश्री सम्मान एवं अनेक प्रतिष्ठित साहित्यिक सम्मान उन्हें प्राप्त हुए हैं। इससे उनके असाधारण व्यक्तित्व का हमें परिचय होता है। उन्होंने पंजाबी तथा हिंदी में किए सृजनात्मक लेखन से उनकी साहित्यिक क्षमता स्पष्ट होती है। इस उपन्यास के सहवास में व्यतीत किया हुआ समय मेरे लिए एक उत्कट अनुभव है। त्रासदी साहित्य मन:पटल पर एक अलग ही आनंद देकर जाता है।

विश्वविख्यात साहित्यकार टॉलस्टॉय के 'युद्ध और शांति' उपन्यास के साथ 'मढी का दीवा' की तुलना की गई है। गुरुदयाल सिंह जी ने इस उपन्यास में शोषितों के जीवन का वास्तव, उत्कट, भावपूर्ण,सरस चित्रण किया है। कृत्रिमता के लिए कहीं भी जगह नहीं है। भारतीय ग्राम्य समाज रचना के एक वेदनासिक्त, अभावग्रस्त,दरिद्री किसान की यह त्रासदी है। अंतश्चक्षू जागृत रखनेवाले को 'जगसीर' जैसे कथानायक हर जगह पर दिखाई देंगे। अमीरी–गरीबी, ऊँच–नीच जातिव्यवस्था, अपेक्षाभंग,विश्वासघात जैसी अनेक बातों से 'जगसीर' सर्वार्थ से झुलसा हुआ है। यही इस उपन्यास का नायक है। उपन्यास खतम् होने पर भी हमारे मन:पटल पर वही छाया रहता है। लेखक की समाज व्यवस्था की तरफ देखने की दृष्टि सूक्ष्म तथा विश्लेषक है। उपन्यास के कथानक के प्रत्येक शब्द से सुबुद्ध पाठक को इसका अनुभव होता है। दरिद्रता को ठुकरानेवाली अमीरी,सामाजिक स्थान निर्देशित करनेवाली जाति व्यवस्था,पारिवारिक जीवन की अनबन, असफल विवाह,नजदीकी व्यक्ति से विश्वासघात,रूढी–परंपराएँ, पारंपारिक अंधश्रद्धा जैसे अनेक संकटों के साथ ग्रामीण अर्थव्यवस्था की नीति,दलालों की घुसपैठ आदि बहुत ही प्रभावी अवरोध होते हैं।

सच देख जाए तो उसीके कारण कृषक आर्थिक गर्त में डूबता जाता है। वित्तीय संस्था के ये भयानक परिणाम 'जगसीर' के रूप में पाठकों तक पहुँचते हैं। अपने आसपास के परिवेश में ही ऐसे अनेक 'जगसीर' होते हैं।जगसीर के वीरान,नीरस,बेबस जीवन में आनंद देनेवाली नायिका है 'भानी'। गुरुदयाल जी ने संवेदनशीलता से उसे शब्दांकित किया है जिससे पाठकों का मन विह्वल हो उठता है। उदात्त प्रेमभावना का यह उत्कट आविष्कार उपन्यास समाप्त होते समय सहृदय पाठकों से भावात्मक दृष्टि से सहा नहीं जाता। सभी स्त्री पात्रों का चित्रण मन पर प्रभाव डालता है। मानवीय गुणावगुणों के बलि चढे जगसीर और बंते के बीच के संवाद पाठकों तक यह बात पहुँचाते हैं कि बंधुत्व की भावना को स्वार्थांधता रोक लेती है। यहाँ व्यवहार महत्त्वपूर्ण होता है। भावना को यहाँ बिल्कुल जगह नहीं होती। उपन्यास पढते समय लगता है कि काँच के लोलक से प्रकाशकिरणों का पृथक्करण होकर जिसप्रकार विविध रंग दिखाई देते हैं वैसे जगसीर की दरिद्रता, जातिभेद,विषम अर्थव्यवस्था और असफल प्रेम के साथ संघर्ष करते समय व्यतीत हुआ जीवन भाषा की मर्यादा में सिमटकर रहना अयोग्य है। इसी हेतु से यह अनुवाद संपन्न हुआ।

साहित्यकार गुरुदयाल सिंह जी के साथ अलग ही ऋणानुबंध स्थापित हुए। इस कारण अनुवाद के इस कार्य को एक विशेष गति प्राप्त हुई। लेखक के साथ हुई पंजाबी वातावरण संबंधी की चर्चा अनुवाद को एक विशिष्ट सांस्कृतिक,सामाजिक दर्जा देकर गई। मैं गुरुदयाल सिंह जी को दीर्घ, स्वस्थ साहित्यिक जीवन के लिए शुभकामनाएँ देती हूँ। गुरुदयाल जी तथा उनके परिवारजनों के प्रति अंत:स्तल से आभार। मेरे परिवारजन प्राय: मेरी हर साहित्यिक गतिविधि में मेरे साथ होते हैं। माँ डॉ.शैलजा पाटील के साथ की चर्चा अनुवाद में सहायक रही। साथ ही प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष रूप में जिनकी सहायता हुई है,उन सभी के प्रति आभार।

डॉ.पद्मा पाटील

अगणात बसलेल्या नंदीला वाटलं सूहटीच्या घरातून कुणीतरी बाहेर पडून चौकाकडं निघालंय.तिची उत्सुकता चाळवली अन् ती काठी पकडून सूहटीच्या घराकडं निघाली.

नंदीला दुरून येताना पाहून सूहटीनं स्वत:शीच म्हटलं, '' आली का पिडा!'' पण तरीही हसत—हसत ती मोठ्या आवाजात म्हणाली,''नमस्कार आई...''

ती भांडी घासता—घासता मध्येच उठली. आतल्या खोलीतून पाट आणून आपल्या जवळ ठेवत नंदीला त्यावर बसण्याची खूण करत पुन्हा भांडी घासू लागली.

''सदा सौभाग्यवती रहा,तुझी मुलंबाळं सुखी राहू देत. भाऊला ही दीर्घायुष्य मिळू देत...'' पाटावर बसत सूहटीशी जवळीक साधत नंदीनं विचारलं,''आज कुणी पाहुणा आलाय, की काय?'' सूहटीनं मोठ्या आवाजात उत्तर दिलं,''हो ना, माझ्या आत्याचा मुलगा आलाय...''

''असा सहजच आलाय की काही कामधंद्यानिमित्त आलाय?''''आई,कामधंद्याशिवाय असं कुणी घराच्या कटकटीतून बाहेर पडलयं का? कीडूचा मधला मुलगा त्याच्या मुलीसाठी मुलगा पहायला आलाय. त्याची मुलगी आता मोठी झालीय ना!''

नन्दी गप्प राहिली.तिचे छोटेसे डोळे एकदा चमकले खरे पण लगेच धुक्यात गुरफटलेल्या ताऱ्यांसारखे निस्तेज झाले.

''असं पहा सूनबाई,''काही क्षण गप्प राहून नंदी तिला म्हणू लागली. असं वाटलं की ती सूहटीला विनंती करतेय...

''अगं तू तर बारा—बारा कोसावरच्या लोकांचं भलं केलंयस...तसं आपल्या दिराचंही थोडं कल्याण केलंस तर...''

सूहटीला हसू आलं पण तिनं ओढणीनं घाम पुसायच्या निमित्तानं चेहऱ्यावरचं ते हसू दडवलं. खरं तर नंदीच्या 'दीर'या